जाहिरातीचा नमुना

उमेद-महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान

ग्रामविकास व जलसंधारण विभाग,महाराष्ट्र राज्य

जिल्हा अभियान व्यवस्थापन कक्ष, वर्धा

**स्वयंसहाय्यता गट/ग्रामसंघ/प्रभागसंघ यांचे मार्फत भोजन व चहा सुविधा पुरविणेबाबत**

उमेद-महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, जिल्हा परिषद **वर्धा** या कार्यालयामार्फत **वर्धा** जिल्ह्यातील प्रभाग/तालुका/जिल्हास्तरीय विविध निवासी/अनिवासी प्रशिक्षण/कार्यशाळा दरम्यान आवश्यक चहा,नाश्ता व भोजनची व्यवस्था NRLM(उमेद) पोर्टल अंतर्गत नोंदणीकृत पात्र असलेल्या व भोजन सुविधा पुरविण्यास इच्छुक असलेल्या स्वयं सहायता गट/ग्रामसंघ/प्रभागसंघ यांची निवड Local Shopping निविदा प्रणाली द्वारे दोन वर्ष कालावधी करिता करावयाची आहे. सदर निविदा प्रक्रियेमध्ये सहभागी होण्यासाठी स्वयं सहायता गट/ग्रामसंघ/प्रभागसंघकडे खालील बाबी असणे आवशक आहे.

- **Food License**
- **भोजन सुविधा पुरविण्याबाबतचा स्वयंसहायता महिला गट/ग्रामसंघ/प्रभागसंघचा ठराव व बँक पासबुक ची झेरोक्स**
- **स्वयंसहायता महिला गट/ग्रामसंघ/प्रभागसंघ NRLM अभियान (उमेद) अंतर्गत NRLM पोर्टल वर नोंदणीकृत असल्याबाबतचे संबंधित तालुका अभियान व्यवस्थापक (उमेद) यांचे प्रमाणपत्र.**

वरील अटींची पूर्तता करणाऱ्या स्वयंसहायता महिला गट/ग्रामसंघ/प्रभागसंघनी खाली दिलेल्या पत्यावरुन किंवा तालुका कार्यालयातून अर्जाचा नमुना प्राप्त करून विहित नमुन्यात व आवश्यक कागदपत्रासाहित दि:२८/१२/२०१९, दुपारी ३.०० वाजेपर्यंत लेखी अर्ज आवश्यक कागदपत्रासह बंद लिफाफ्यात जिल्हा कार्यालयात सादर करावा. कोणत्याही कारणास्तव मुदती नंतर प्राप्त होणाऱ्या अर्जांना सदर निविदा प्रक्रिये मध्ये सहभागी करून घेता येणार नाही याची कृपया नोंद घ्यावी.

(सही)

मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद.
तथा जिल्हा अभियान संचालक, जिल्हा अभियान व्यवस्थापन कक्ष
महाराष्ट्र राज्य ग्रामीण जिवनोन्नती अभियान, जुनी जिल्हा परिषर,
सरकारी दवाखान्याच्या बाजुला, सुभाष चौक, वर्धा

महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनन्नोती अभियान,उमेद
जिल्हा अभियान व्यवस्थापन कक्ष
जुनी जिल्हा परिषद इमारत,शासकीय रुग्णालयाच्या बाजूला,वर्धा
Email-dmmuwardha1@gmail.com

मराग्राजीअ/जीअव्यकव/संपादणूक/ २५/२०१९-२० दिनांक १३/१२/२०१९

प्रती,

---------------

---------------

विषय- जिल्हा अभियान व्यवस्थापन कक्ष वर्धा मार्फत जिल्हास्तरीय/तालुकास्तरीय/प्रभागस्तरीय विविध निवासी/अनिवासी प्रशिक्षण,कार्यशाळा,आढावा सभा व इतर कार्यक्रमादरम्यान चहा,नाष्टा व जेवणाचे दर निश्चितकरण्यासाठी दरपत्रक सादर करण्याबाबत.

महोदय,

१) दीन दयाल अंत्योदय योजना, हि योजना ग्रामीण भागातील गरीबी निर्मूलनासाठी भारत सरकारच्या ग्रामीण विकास मंत्रालयाने सुरू केलेली महत्वाकांक्षी योजना आहे. महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान (एमएसआरएलएम-उमेद) २०११ मध्ये राष्ट्रीय ग्रामीण जीवनोन्नती अभियान (एनआरएलएम) - आजीविका यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू करण्यात आली. गरिबांच्या शाश्वत जीवनशैलीचा मार्ग म्हणून कार्य करणाऱ्या समाजावर आधारित संस्था तयार करून त्यांची मजबुती करून महाराष्ट्रातील ग्रामीण भागातील दारिद्र्य कमी करणे हा या अभियानाचा उद्देश आहे. अभियान राज्यात सर्व जिल्हात इंटेन्सिव पद्धतीने राबविण्यात येत आहे. उमेद –महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान यांचे राज्य कार्यालय , सी.बी.डी. बेलापूर ,नवी मुंबई येथे असून वर्धा जिल्हास्तरावर अभियानाचे अंमलबजावणी जिल्हा अभियान व्यवस्थापन कक्ष, जुनी जिल्हा परिषद इमारत, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा वर्धा यांचे मार्फत करण्यात येते .

२) जिल्हा अभियान व्यवस्थापन कक्ष वर्धा , महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान, जिल्हा अभियान व्यवस्थापन कक्ष, जुनी जिल्हा परिषद इमारत, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा वर्धा या कार्यालयाअंतर्गत वर्धा जिल्हा/तालुकास्तरीय व वर्धा,सेलू,देवळी,समुद्रपूर,आर्वी,आष्टी,कारंजा,हिंगणघाट तालुकास्तरीय तसेच जिल्हा परिषद वर्धा येथील प्रभाग अंतर्गत होणार्या विविध निवासी/अनिवासी प्रशिक्षण,कार्यशाळा,आढावा सभा व इतर कार्यक्रमादरम्यान चहा,नाष्टा व जेवणाचे दर पुढील २ वर्ष कालावधी साठी निश्चित करण्याकरिता NRLM(उमेद) अभियानातील NRLM पोर्टल वर नोंदणीकृत वर्धा जिल्ह्यातील चहा,नाष्टा व जेवण सुविधा पुरवण्यासाठी इच्छुक **स्वयंसहायता महिला गट/ग्रामसंघ/प्रभाग संघ** द्वारे खालीलप्रमाणे दरपत्रक आमंत्रित करण्यात येत आहे

| विवरण/तपशील | अंदाजित प्रशिक्षणार्थी संख्या प्रती महिना |
|---|---|
| १) **प्रशिक्षणार्थी** करिता सकाळचा चहा<br>२)नाश्ता | १०० प्रशिक्षणार्थी* प्रती महिना |
| २) **प्रशिक्षणार्थी** करिता सकाळचा नाश्ता(पोहा,उपमा,इडली,सांभारवडा किंवा तत्सम) | १०० प्रशिक्षणार्थी* प्रती महिना |
| ३) **प्रशिक्षणार्थी** करिता दुपारचा चहा | १०० प्रशिक्षणार्थी* प्रती महिना |
| ४) **प्रशिक्षणार्थी** करिता दुपारचे पोटभर शाकाहारी भोजन(चपाती/भाकरी, १ सुकी भाजी,१ पातळ भाजी ,भात,वरण,कडी,१गोड पदार्थ,सलाद,लोणचे) | १०० प्रशिक्षणार्थी* प्रती महिना |
| ५)**प्रशिक्षणार्थी** करिता सायंकाळचा चहा | १०० प्रशिक्षणार्थी* प्रती महिना |
| ६) **प्रशिक्षणार्थी** करिता रात्रीचे पोटभर शाकाहारी भोजन (निवासी | १०० प्रशिक्षणार्थी* प्रती महिना |

| | |
|---|---|
| **प्रशिक्षण असल्यास**)(चपाती/भाकरी, १ सुकी भाजी,१ पातळ भाजी ,भात,वरण,कडी,१गोड पदार्थ,सलाद,लोणचे) | |
| **७) प्रशिक्षणार्थी** करिता रात्रीचे पोटभर मांसाहारी भोजन **(**मागणीनुसार निवासी प्रशिक्षण असल्यास** )(चपाती/भाकरी,भात,मांसाहारी भाजी, सलाद) | ५० **प्रशिक्षणार्थीप्रती * महिना** |

* **प्रशिक्षणार्थी** सदर संख्या हि अंदाजे प्रती महिना असून असे वर्षभर पुरवठा करावा लागेल या संख्येत वाढ अथवा घट होऊ शकते.

** मांसाहारी भोजन हे आवश्यकतेनुसार मागविण्यात येईल.

**३)निविदेचे/दरपत्रकातील दर:**

- **स्वयंसहायता महिला गट प्रभाग संघ/ग्रामसंघ/**द्वारे दिलेले दर हे करार कालावधीत स्थिर राहतील.
- वरील सर्व भोजन सुविधेसाठी दर भरण्यात यावे
- एका **स्वयंसहायता महिला गट प्रभाग संघ/ग्रामसंघ/**ने फक्त एकच दरपत्रक सादर करावी.
- जेवणाचे दर सादर करताना त्यामध्ये पिण्याचे पाणी व ग्लास यांचा समावेश करावा.
- दरा मध्ये चहाच्या कपाची, नाष्टा व जेवणासाठी डिश/ताटे,वाट्या यांचा समावेश करावा.

**४) दरपत्रकाची वैध्यता**

- सादर केलेले दरपत्रके उघडल्या पासून ४५ दिवसापर्यंत वैध् राहील.

**५) पात्रता**

- Food License
- **भोजन सुविधा पुरविण्याबाबतचा स्वयंसहायता महिला गट/ग्रामसंघ/प्रभागसंघचा ठराव व** बँक पासबुक ची झेरोक्स
- **स्वयंसहायता महिला गट/ग्रामसंघ/प्रभागसंघ NRLM अभियान(उमेद) अंतर्गत NRLMपोर्टल वर नोंदणीकृत असावा.**

**६) दरपत्रकांचे मूल्यमापन:**

प्राप्त दरपत्रकांचेमूल्यमापन खालील प्रमाणे जिल्हा अभियान व्यवस्थापन कक्ष करेल

- **वर्धा जिल्हा व तालुकास्तरीय अंतर्गत** होणार्या विविध निवासीअनिवासी/ प्रशिक्षण आढावा सभा,कार्यशाळा, व इतर कार्यक्रमाकरिता वर्धा तालूक्यातील सर्वात कमी दर उल्लेखित व मुद्दा क्रमांक ५ नुसार पात्र असलेल्या प्रथम 3 (3L,2L,1L)**स्वयंसहायता महिला गट प्रभाग संघ/ग्रामसंघ/**सोबत करार करण्यात येईल.
- सेलू,देवळी,समुद्रपूर,आर्वी,आष्टी,कारंजा,हिंगणघाट **तालुकास्तरीय अंतर्गत** होणार्या विविध निवासीअनिवासी/ प्रशिक्षण आढावा सभा,कार्यशाळा, व इतर कार्यक्रमाकरिता त्याच तालूक्यातील सर्वात कमी दर उल्लेखित व मुद्दा क्रमांक ५ नुसार पात्र असलेल्या प्रथम (3L,2L,1L) 3**स्वयंसहायता महिला गट प्रभाग संघ/ग्रामसंघ/**सोबत करार करण्यात येईल.
- जिल्हा परिषद वर्धा येथील विविध **प्रभाग अंतर्गत** प्रभाग/गाव स्तरावर होणार्या विविध निवासीअनिवासी/ प्रशिक्षण आढावा सभा,कार्यशाळा, व इतर कार्यक्रमाकरिता त्याच प्रभागातील सर्वात कमी दर उल्लेखित व मुद्दा क्रमांक ५ नुसार पात्र असलेल्या प्रथम (3L,2L,1L) 3**स्वयंसहायता महिला गट प्रभाग संघ/ग्रामसंघ/**सोबत करार करण्यात येईल.
- दरपत्रकावर स्वाक्षरी व शिक्का असावा
- अटी व नियम मान्य असावेत

- दर हे सर्व खाद्यपदार्थ साठी भरलेले असावेत
- मुद्दा क्र पाच नुसार पात्र असावेत
- सर्व दरपत्रकांचे मूल्यमापन सर्व बाबींचे मिळून केले जाईल .

**७)दरपत्रकाची निश्चिती:**

प्राप्त निविदेतील दरांचे तुलना केली असता सर्वात कमी दर असणाऱ्या व निविदा मध्ये नमूद केलेल्या अटी व शर्ती नुसार असणाऱ्या स्वयं सहायता/ग्राम संघ/प्रभाग संघ ची **L1,L2,L3** प्रकाराने निवड केली जाईल व त्याप्रकारे करार करण्यात येईल.

**८)भोजन सुविधा पुरवठा करण्याचे ठिकाण:**

वर्धा जिल्हा कार्यालय व वर्धा तालुका कार्यालय तसेच सेलू तालुका कार्यालय,देवळी तालुका कार्यालय,समुद्रपूर तालुका कार्यालय,आर्वी तालुका कार्यालय,आष्टी तालुका कार्यालय,कारंजा तालुका कार्यालय, हिंगणघाट तालुका कार्यालय, किंवा वेळोवेळी आवश्यकतेनुसार इतर ठिकाणी व जिल्हा परिषद वर्धा येथील जिल्हा परिषद प्रभाग अंतर्गत प्रभाग/गाव स्तरावर होणार्या विविध निवासी/अनिवासी प्रशिक्षण,कार्यशाळा,आढावा सभा व इतर कार्यक्रमाच्या स्थळी भोजन सुविधा मागविण्यात येईल. भोजन व्यवस्थेच्या दरामध्ये वाहतूक,हमाली,उतराई, वाटप, समावेश करण्यात यावा हा खर्च वेगळयाने दिला जाणार नाही

९)देयक सादर केल्या नंतर एक आठवड्यात PFMS द्वारे online पद्धतीने रक्कम अदा करण्यात येईल

१०) आपणास विनंती करण्यात येते कि आपण आपले दरपत्रक हे दिनांक २८/१२/२०१९ दुपारी ३.०० पर्यत विहित नमुन्यात शिलबंद पाकिटात जिल्हाअभियान व्यवस्थापन कक्ष, महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान (उमेद),जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा,शासकीय रुग्णालय च्या बाजूला वर्धा येथे सादर करावे.**सीलबंद लिफाफा वर " ................................" या जिल्हा/तालुका/प्रभाग स्तरीय विविध निवासी/अनिवासी प्रशिक्षण,कार्यशाळा,आढावा सभा व इतर कार्यक्रमाच्या स्थळी भोजन सुविधा याबाबतचे दरपत्रक असे ठळक अक्षरात उल्लेख करावा.**

११) दरपत्रक सादर करण्यासाठीच्या निर्धारित कालमर्यादेनंतर प्राप्त झालेल्या सर्व दरपत्रक फेटाळल्या जातील व त्या खुल्या न करताच पुरवठादारांना परत केल्या जातील.

१२) दरपत्रक दि. २८/१२/२०१९ दुपारी ३.०० वाजता उपस्थित असणाऱ्या स्वयं सहायता /ग्राम संघ/प्रभाग संघच्या पदाधिकारी/प्रतिनिधीच्या समक्ष खुल्या केल्या जातील .

१३) कोणतेही दरपत्रक स्वीकारण्याचे किंवा नाकारण्याचे, प्रक्रिया रद्द करण्याचे व कंत्राट बहाल करण्याआधी सर्व दरपत्रक फेटाळण्याचे अधिकार मा.मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद तथा जिल्हा अभियान संचालक,महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान (उमेद),वर्धा यांनी राखून ठेवला आहे.

जिल्हा अभियान संचालक
तथा मुख्य कार्यकारी अधिकारी
जि.प.वर्धा

महाराष्ट्र शासन

**महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान**
जिल्हा अभियान व्यवस्थापन कक्ष, वर्धा
जुनि जि.प. इमारत, शासकीय रुग्नालयचे बाजुला, जि. वर्धा
**Email- Id** :-dmmuwardha1@gmail.comफोन नं. ०७१५२ - २४९२२९

उमेद

जा. क्र. मराग्राजीअ/व./संपा./२०१९
दिनांक :-१३ /१२ /२०१९

## दरपत्रक नमुना

प्रती,

मा. जिल्हा अभियान संचालक
महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान तथा
मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, वर्धा

**विषय :-प्रभाग/तालुका/जिल्हास्तरीय विविध निवासी/अनिवासी प्रशिक्षण/कार्यशाळा दरम्यान आवश्यक चहा, नाश्ता, व भोजनाची व्यवस्था करणेसाठी दरसादर करण्याबाबत.**

संदर्भ :- दिनांक.............................. रोजी दैनिक लोकमत या वृत्तपत्रात प्रकाशित जाहिरात अन्वये.

मा. महोदय,

वरील उल्लेखित संदर्भ अन्वये आम्ही दिनांक.............................. रोजी दैनिक लोकमत या वृत्तपत्रात प्रकाशित जाहिरात नुसार(बचत गट/ग्रामसंघ/प्रभागसंघाचे पुर्ण नांव व पत्ता)...................................... ...................................................................................................................... जिल्हा वर्धा येथील महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान अंतर्गत आयोजीत विविध निवासी/अनिवासी प्रशिक्षण/कार्यशाळा दरम्यान आवश्यक चहा, नाश्ता व भोजनाची व्यवस्था ........................... या तालुका/प्रभाग स्तरावर पुरविण्यास ईच्छुक आहोत. आमच्या द्वारे पुरविण्यात येणाऱ्या चहा, नाश्ता, व भोजनाचे दर खालील प्रमाणे राहतील.

| अ.क्र. | विवरण | प्रति व्यक्ती दर |
|---|---|---|
| १ | प्रशिक्षणार्थी करीता सकाळचा चहा | |
| २ | प्रशिक्षणार्थी करीता सकाळचा नास्ता (पोहा, उपमा, ईडली, सांभार वडा, इत्यादी किंवा तत्सम) | |
| ३ | प्रशिक्षणार्थी करीता दुपारचा चहा | |
| ४ | प्रशिक्षणार्थी करीता दुपारचे भोजन (शाकाहारी) (चपाती, भात, वरण, दोन प्रकारची भाजी, कढी, गोड पदार्थ, सलाद) | |
| ५ | प्रशिक्षणार्थी करीता सायंकाळचा चहा | |
| ६ | प्रशिक्षणार्थी करीता रात्रीचे भोजन (शाकाहारी) (चपाती, भात, वरण, दोन प्रकारची भाजी, कढी, गोड पदार्थ, सलाद) | |
| ७ | प्रशिक्षणार्थी करीता रात्रीचे भोजन (मांसाहारी) (चपाती, भात, मांसाहारी भाजी, सलाद) | |
| | **एकुण दर** | |

आम्ही या द्वारे प्रमाणित करतो की, आम्ही महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान अंतर्गत आयोजीत विविध निवासी/अनिवासी प्रशिक्षण/कार्यशाळा दरम्यान आवश्यक चहा, नाश्ता, व भोजनाची व्यवस्था पुरविण्यासाठी ईच्छुक आहोत. करीता संधी प्रदान करण्यात यावी हि विनंती.

अध्यक्ष/सचिव (स्वाक्षरी व शिक्का)